# प्रकरण - एक

## प्रास्ताविक

१.१ संशोधन समस्येची पार्श्वभूमी

१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन

१.३ संशोधन विषयाचे महत्व

१.४ संशोधनाची उद्दिष्टे

१.५ संशोधनाच्या मर्यादा

१.६ संशोधन पध्दती

१.७ प्रकरणीकरण

## १.१ संशोधन विषयाची पार्श्वभूमी :

आजचा विद्यार्थी हा भावी नागरिक आहे. हा विद्यार्थी २१ व्या शतकातील भारताचे भवितव्य घडविणारा शिल्पकार होणार आहे. या दृष्टीकोनातून २१ व्या शतकाची आव्हाने पेलण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. ही क्षमता त्याला दिल्या जाणाऱ्या शिक्षण-पध्दतीतूनच तो आत्मसात करू शकेल. कारण शिक्षणाद्वारेच त्याला आपल्या जबाबदारीची आणि कर्तव्याची जाणीव निर्माण होणार आहे. शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे मूलभूत साधन आहे. शिक्षणाद्वारे सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अभ्यासक्रमात विविध विषयांचे आयोजन केलेले असते. शालेय अभ्यासक्रमातील इतिहास हा एक अनिवार्य विषय आहे.

" ज्या भूतकालीन घटना तद्नंतरच्या अनेक युगांत नोंद घेण्याच्या लायक असतात त्यांचा वृत्तांत म्हणजे इतिहास होय " असे बर्कहार्टने म्हटले आहे. (पत्की, १९८०) यावरून इतिहास विषयाचे महत्व स्पष्ट होते. इतिहासाचा जुना दृष्टीकोन आज बदलला आहे. भारतातील लोकशाही समाजवादास पोषक अशी मनोवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, गतिमान जीवनाची विचारमूल्ये आत्मसात करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, त्यांचे जीवन प्रगत विचारमूल्यांनी समृध्द व्हावे, त्यांची अस्मिता जागी व्हावी, त्यांच्या जीवनाची परिणती सामाजिक व सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यात व्हावी व त्यांच्या निर्भयवृत्ती वाढीस लागाव्यात तसेच भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर त्यांना वर्तमानकाळातील घडामोडींचे आकलन व्हावे व त्याद्वारे भवितव्य उज्ज्वल करण्याची जाण निर्माण व्हावी, त्यातून त्यांना निकोप राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सर्वधर्मसमभाववृत्ती याबद्दल प्रेरणा मिळावी व सुबुध्द नागरिक बनावा हा इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोन असल्याने शालेय अभ्यासक्रमातील इतिहासाचे स्थान उच्च प्रतीचे आहे.

सन १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले आहे. त्यात संपूर्ण भारतात एकच अभ्यासक्रम असावा व त्यातून राष्ट्रीय एकात्मता साधावी हा विचार पुढे आला. त्यासाठी १० गाभातत्वे आपल्यासमोर ठेवण्यात आली ती पुढीलप्रमाणे :

१) भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास,
२) घटनात्मक जबाबदाऱ्या,
३) राष्ट्रीय व्यक्तिमत्वाची जोपासना,
४) भारताचा समान सांस्कृतिक वारसा,
५) समानता, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता,
६) स्त्रीपुरूष समानता,
७) पर्यावरणाचे रक्षण,
८) सामाजिक अडसरांचे निर्मूलन,
९) मर्यादित कुटुंबाची आवश्यकता,
१०) शास्त्रीय दृष्टीकोनाचा परिपोष.

वरील गाभातत्वांचा विचार करता हा अभ्यासक्रम इतिहास विषयाशी निगडीत असणार आहे. एकूण काय, तर राष्ट्रीय अभ्यासक्रमात इतिहास विषयाला प्राधान्य प्राप्त झाले आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रमातील इतिहास विषयाला प्राप्त झालेले प्राधान्य विचारात घेता या विषयाचे अध्यापन प्रभावीरित्या व परिणामकारक झाले पाहिजे. इतिहासाचे अध्यापन करीत असताना शिक्षकाने विषयज्ञान लक्षात घेऊन योग्य पध्दतींची निवड केली पाहिजे. शैक्षणिक साधनांचा वापर केला पाहिजे. विद्यार्थ्यांना कृतिशील ठेवले पाहिजे. शालेय जीवनात अध्ययन सवयींचा विकास केला पाहिजे. कारण अध्यापनापेक्षा अध्ययन हे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांपुढे समस्यात्मक परिस्थिती निर्माण करून त्यांना स्वत: शिकण्याची

संधी दिली पाहिजे. परंतु इतिहासाचे अध्यापन करणारे काही शिक्षक पदवीला इतिहास विषयाचे अध्ययन न केलेले असतात. कित्येकांनी बी.एड्.ला इतिहास विशेष अध्यापन पध्दती निवडलेली नसते. तसेच इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी आठवड्यात केवळ दोन तासिका निर्धारित केलेल्या असतात आणि अध्यापनही पारंपारिक पध्दतीने केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घटनांचे आकलन होत नाही. इतिहास अध्ययन अध्यापनात अडचणी येतात. विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाची अभिरूची वाढत नाही. तेव्हा वस्तुस्थिती समजून घेऊन कारणमीमांसा करणे आवश्यक वाटल्याने या विषयाची निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधक इतिहास विषयाचे पदव्युत्तर आहेत. गेली अनेक वर्षे ते इतिहासाचे अध्यापन करतात. त्यामुळे इतिहास हा आवडीचा, जिव्हाळ्याचा विषय असल्याने संशोधनासाठी तो निवडण्याचे हेही एक कारण आहे.

## १.२ संशोधन समस्येचे शब्दांकन :

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन खालीलप्रमाणे केले आहे :

" माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्ययन-अध्यापन कार्यनीतींचे विकसन."

प्रस्तुत संशोधनाच्या विधानात वापरलेल्या विविध संज्ञांच्या स्पष्टीकरणासाठी त्यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत :

माध्यमिक स्तर -

माध्यमिक स्तर या संज्ञेमध्ये इ. ५ वी ते १० वी या वर्गांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनापुरता माध्यमिक स्तर म्हणजे इ. ९ वीचा

वर्ग स्वढयापुरताच अर्थ मर्यादित आहे.

<u>इतिहास</u> -

इतिहास म्हणजे माध्यमिक स्तरावर इ. ९ वीच्या अभ्यासक्रमातील एक विशेष विषय या अर्थाने वापरला आहे.

<u>अध्ययन</u> -

इतिहास विषयाचा अभ्यास करताना अथवा शिकत असताना विद्यार्थी करीत असलेल्या कृतींशी संबंधित हा शब्द वापरला आहे.

<u>अध्यापन</u> -

शिक्षकाने वर्गात शिकवित असतानाचे वर्तन या अर्थाने अध्यापन हा शब्द वापरला आहे.

<u>कार्यनीतींचे विकसन</u> -

Developing Strategies या कार्यनीतींचे विकसन असा शब्द वापरला आहे. Strategies हा शब्द मूलत: युध्दक्षेत्राशी संबंधित वापरला जातो. त्याचा शब्दश: अर्थ युध्दकौशल्य, लष्करी डावपेच, कुशलव्यवस्था, रचना कौशाल्ये असा आहे. एखादी समस्या सोडविण्यासाठी योग्यरित्या, कौशल्याने योजना करणे असा अर्थ होतो.

" युध्दकालीन आणि शांतताकालीन परिस्थितीत राजकीय, आर्थिक, मानसशास्त्रीय आणि सैनिकी शक्तींचा वापर करण्याचे आणि तिचा विकास करण्याचे शास्त्र आणि कला म्हणजेच कार्यनीती होय. असा वापर केल्यामुळे विजय प्राप्त करण्यासाठी पोषक स्वरूपाची परिस्थिती निर्माण होण्यास जास्तीत जास्त मदत मिळते आणि पराजयाची शक्यता जास्तीतजास्त कमी होते." (Carter V. Good, 1973)

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

" विशिष्ट परिणाम साध्य करण्यासाठी आणि अनावश्यक परिणाम टाळण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या कृतींचा संच म्हणजे कार्यनीती होय." (Lee C. Deighton, 1971)

" अध्यापन कार्यनीती म्हणजे अध्यापन पाठाची सर्वसाधारण योजना होय. या योजनेत अध्यापनाच्या उद्दिष्टांनुसार विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीत घडवून आणावयाच्या अपेक्षित बदलांचा आराखडा आणि अध्यापन कार्यनीतींचा अवलंब करण्यासाठी आवश्यक अशा नियोजित क्लुप्त्यांची रूपरेषा यांचा समावेश होतो." (Sharma R.A.,1980)

प्रस्तुत संशोधनात इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्ययन-अध्यापन अवलंबून असणाऱ्या घटकांबाबत म्हणजे विषयाचा अभ्यासक्रम, त्याची काठिण्य-पातळी, वापरावयाच्या अध्यापन पध्दती, शैक्षणिक साधने, अभ्यासक्रमातील ऐतिहासिक संबोध आणि परिणामकारक मूल्यशिक्षण याबाबतची सद्यःस्थिती जाणून घेऊन या घटकांच्याद्वारे अपेक्षित यश प्राप्ती व्हावी यासाठी या सर्व घटकांचा विचार करून अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी त्यामधील सद्यःस्थितीत जाणवलेल्या अडचणींचा विचार करून त्यावर उपाययोजना सुचविणे व अध्ययन-अध्यापनात काही कृती, क्लुप्त्या व पध्दती यांची योजना करणे या अर्थाने कार्यनीतींचे विकसन हे शब्द वापरले आहेत.

## १.३ <u>संशोधन विषयाचे महत्व :</u>

प्रस्तुत शोध प्रबंधात इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्ययन-अध्यापन परिणामकारकरित्या व्हावे यासाठी कार्यनीतींचा आढावा घेण्यात आला.आहे. नवीन शैक्षणिक धोरणातील इतिहासाचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन शालेय विषयातील इतिहास हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातील मूलस्थान मानला आहे. या दृष्टीने इतिहास विषयाची माध्यमिक स्तरावरील सद्यःस्थिती व अध्ययन-अध्यापन कार्यनीतींचा सूक्ष्मपणे विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधनांतर्गत संशोधकाने इ. ९ वी च्या इतिहासाचे पाठ्यांश पृथःक्करण, अभ्यासक्रमाची काठिण्य पातळी, शिक्षक वापरीत असलेल्या अध्यापन पध्दती व शैक्षणिक साधने, अभ्यासक्रमपूर्तीसाठीची निर्धारीत वेळ, ऐतिहासिक संबोध व मूल्यशिक्षण या सर्व घटकांची सद्य:स्थिती प्रश्नावली व मुलाखतीद्वारे जाणून घेतल्याने संशोधनात वस्तुनिष्ठता आली आहे.

प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरून इ. ९ वीच्या पुनर्रचित इतिहासाच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पाहता अध्ययन-अध्यापन प्रभावीरित्या व परिणामकारकरित्या झाले पाहिजे. तसेच इ. १० वी साठीची विद्यार्थ्यांची पूर्वतयारीही चांगली झाली पाहिजे. सबब इ. ९ वीचा इतिहासाचा अभ्यासक्रम नियोजित वेळत व्हावा, इतिहासाच्या अभ्यासक्रमातील पाठ्यांशाला अनुसरून वेगवेगळया पध्दती वापरल्या पाहिजेत, संबोध स्पष्ट होऊन मूल्यांची जाण निर्माण व्हावी असेस संशोधकाला वाटते. इतिहास अध्यापकाने पाठ्यांशाचे पृथ:क्करण करून, काठिण्य पातळीचा विचार करून विद्यार्थी गट आणि निर्धारीत वेळ यांचा सखोल विचार करावा या उद्देशाने प्रस्तुत विषय संशोधकाने निवडला आहे.

भावी सुजाण नागरिक बनणारा विद्यार्थी केंद्रस्थानी मानून शिक्षकाने इतिहास विषयाचे अध्यापन नवनवीन पध्दतींचा वापर करून कसे करावे ? अध्यापनात योग्य शैक्षणिक साधनांचा वापर करून अध्यापन मनोरंजक कसे करावे ? इतिहास विषयक अभिरूची कशी वाढवावी ? ऐतिहासिक संबोध परिणामकारकरित्या कसे स्पष्ट करावेत आणि या विषयातून सुजाण नागरिकाच्यादृष्टीने उपजत कलागुणांचा विचार करून मूल्यांची जडणघडण अप्रत्यक्षपणे इतिहास विषयाच्या माध्यमातून कशी करावी यासंबंधी या शोध प्रबंधात ऊहापोह केल्याने व सद्य:स्थितीत या

विषयाची खालावलेली स्थिती भावी काळात इतर विषयांच्या बरोबरीने किंबहुना अधिक पटीने एक आवश्यक व महत्वाचा विषय म्हणून शालेय अभ्यासक्रमात या विषयाचे स्थान उंचावण्याच्या दृष्टीने शिक्षक व विद्यार्थी यांना अधिक मार्गदर्शक ठरणारा हा शोधप्रबंध म्हणून या विषयाचे महत्व अनन्यसाधारण वाटते.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाने इ. ९ वीच्या इतिहास या विषयाच्या दैनंदिन अध्ययन-अध्यापन कार्यात सुधारणा घडवून आणण्याच्या-दृष्टीने मदत होईल असे संशोधकाला वाटते.

१.४ <u>संशोधनाची उद्दिष्टे</u> :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

१) इ. ९ वीच्या इतिहास अभ्यासक्रमाचे पृथ:क्करण, निर्धारीत तासिका, पाठाची उद्दिष्टे याबाबतची योग्यायोग्यता जाणून घेणे.

२) इ. ९ वीच्या इतिहास अध्यापनाच्या सद्य:स्थितीचा शोध घेणे.

३) इ. ९ वीच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमाची काठिण्य पातळी, ऐतिहासिक संबोध आणि मूल्यशिक्षण यांचा विचार करून पाठ्यपुस्तकाची विभागणी करणे.

४) इ. ९ वीचा इतिहासाचा अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती, काठिण्य पातळी, ऐतिहासिक संबोध आणि मूल्यशिक्षण यांना अनुसरून अध्ययन-अध्यापन कार्यनीती सुचविणे.

१.५ संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत :

१) प्रस्तुत संशोधन इयत्ता ९ वीच्या वर्गापुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन इयत्ता ९ वीच्या इतिहास विषयापुरतेच मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र तासगाव तालुक्यापुरतेच मर्यादित आहे. सबब तासगाव तालुक्यातील १७ माध्यमिक शाळांचा समावेश केला आहे. त्या शाळांची यादी परिशिष्ट ' क ' मध्ये दिली आहे.

१.६ संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन हे सद्य:स्थितीशी निगडीत असल्याने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. संशोधन विषयासंदर्भात सद्य:स्थिती काय आहे ? हे समजून घेण्यासाठी ही पध्दती उपयुक्त ठरणार आहे. या पध्दतीच्या आधारे मिळालेल्या माहितीचे संकलन, वर्गीकरण व मूल्यांकन करून शिफारशी केल्या आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक ती महत्वाची माहिती गोळा करण्यासाठी संशोधकाने खालील साधनांचा वापर केला आहे.

१. प्रश्नावली

२. मुलाखती.

१) प्रश्नावली -

प्रश्नावलीतून आपले इच्छित साध्य होते की नाही व प्रश्नावलीत काही सुधारणा करणे आवश्यक आहे काय ? हे ठरविण्यासाठी प्रश्नावलीचा प्रत्यक्ष वापर करण्यापूर्वी तिची पूर्वचाचणी घेणे आवश्यक असल्याने इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या ५ अध्यापकांना प्रश्नावली देऊन तिचे

परीक्षण केले.

पूर्वचाचणीनंतर प्रश्नावलीचे संस्करण करावे लागते. संस्करणात प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्न नि:संदिग्ध आहे काय ? प्रश्नाचा आशय व प्रश्नांचा क्रम बरोबर आहे काय ? याची खात्री इतिहास तज्ज्ञांकडून करून घेतली.

तासगाव तालुक्यातील इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करीत असलेल्या २५ अध्यापकांकडून प्रश्नावल्या भरून घ्यायच्या असल्याने संशोधकाने तासगावमधील इ. ९ वीच्या इतिहास अध्यापन करणाऱ्या ९ अध्यापकांना प्रत्यक्ष भेटून प्रश्नावल्या दिल्या. तासगाव शेजारील माध्यमिक शाळेत स्वत: संशोधकाने जाऊन १० इतिहास अध्यापकांना प्रश्नावल्या दिल्या. ६ प्रश्नावल्या पोष्टाने पाठविल्या. प्रश्नावली भरण्यासाठी अध्यापकांना १५ दिवसांचा कालावधी दिला होता. प्रश्नावल्या भरून घेण्यासाठी संशोधकाने मुख्याध्यापकांमार्फत इतिहास अध्यापकांशी संपर्क साधला. दिलेल्या मुदतीत २० प्रश्नावल्या भरून आल्या. इतर ५ प्रश्नावल्यांसाठी संशोधकाने शिक्षकांशी पुन्हा संपर्क साधला व प्रश्नावल्या मिळविल्या.

तासगाव तालुक्यातील इ. ९ वीच्या इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या १७ शाळांमधील २५ शिक्षकांना दिलेली प्रश्नावली परिशिष्ट ` ब ` मध्ये दिलेली आहे. प्रश्नावली भरून प्रतिसाद दिलेल्या इतिहास शिक्षकांची यादी परिशिष्ट ` ड ` मध्ये दिली आहे. प्रश्नावलीचे ` अ ` विभाग व ` ब ` विभाग असे दोन विभाग दिले आहेत. प्रश्नावलीतील प्रश्न बंदिस्त, संमिश्र व मुक्त स्वरूपाचे आहेत. प्रश्नावलीचे विश्लेषण परिशिष्ट ` अ ` मध्ये दिले आहे.

२) <u>मुलाखती</u> -

प्रश्नावलीला जोड म्हणून संशोधकाने शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील इतिहास विशेष अध्यापन पद्धतीचे अध्यापन करीत असलेल्या १० अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखतीवेळी विचारलेल्या प्रश्नांची यादी परिशिष्ट ' ई ' मध्ये दिलेली आहे. मुलाखती घेतलेल्या अधिव्याख्यात्यांची यादी परिशिष्ट ' इ ' मध्ये दिली आहे.

मुलाखतीचे प्रश्न संबंधित अधिव्याख्यात्यांना अगोदर पाठविलेले होते. प्रश्न अगोदर पाठविण्याचा उद्देश त्यांची मुलाखत देण्याची मानसिक तयारी व्हावी हा होता. प्रथम अधिव्याख्यात्यांना मुलाखतीसाठीची सोयीची वेळ विचारून घेतली. त्यांनी दिलेल्या वेळी त्यांना भेटून संशोधकाने मुलाखती घेतल्या.

प्रश्नावलीद्वारे जी महत्वाची माहिती मिळविणे अशक्य होते ती माहिती मुलाखतीद्वारे मिळण्यास खूपच मदत झाली. तसेच प्रश्नावलीद्वारा मिळविलेल्या माहितीची विश्वासार्हता वाढण्यासाठी या मुलाखतीचा उपयोग झाला.

## १.७ <u>प्रकरणीकरण</u> :

इतिहास शिक्षकांना दिलेल्या प्रश्नावलीद्वारा गोळा झालेल्या व अधिव्याख्यात्यांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण करून अन्वयार्थ लावला आहे. अन्वयार्थ लावून त्यावर आधारीत निष्कर्ष काढले आहेत व योग्य त्या शिफारशी केल्या आहेत. या सर्वांचे विभाजन खाली दर्शविल्याप्रमाणे पाच प्रकरणात केले आहे.

## प्रकरण-एक : प्रास्ताविक

या प्रकरणामध्ये संशोधकाला प्रस्तुत संशोधन समस्येच्या अभ्यासाची गरज का भासली याचा ऊहापोह केला असून समस्येचे शब्दांकन केले आहे. संशोधन विषयाचे महत्व, उद्दिष्टे व मर्यादा स्पष्ट करून कोणती संशोधन पध्दती वापरली आहे हे नमूद केले आहे. थोडक्यात, या प्रकरणामधून वाचकाला संशोधन विषयाचा परिचय करून दिला आहे.

## प्रकरण-दोन : संशोधन विषयाशी संबंधित संशोधित साहित्याचा मागोवा

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित संशोधित साहित्याचा आढावा घेतला आहे. या प्रकरणात इतर संशोधकांनी संशोधन विषयाशी संबंधित कोण-कोणते संशोधन केले आहे, कोणत्या प्रकारची सामग्री गोळा करण्यात आली, त्यासाठी कोणती साधने वापरली, गोळा केलेल्या सामग्रीचे कशाप्रकारे वर्गीकरण, विश्लेषण करण्यात आले, अन्वयार्थ कसा लावला, निष्कर्ष कोणते काढण्यात आले याविषयी ऊहापोह केला आहे. त्यामुळे हे प्रकरण खुद्द संशोधकालाही प्रस्तुत संशोधन कसे करावे याविषयी मार्गदर्शक ठरले आहे.

## प्रकरण-तिसरे : इतिहास विषयाचे महत्व, इतिहास अध्यापन पध्दती व अध्यापन कार्यनिती

" माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्ययन-अध्यापन कार्यनीतींचे विकसन " हा संशोधन विषय असल्याने इतिहास विषयाचे महत्व, इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दती आणि अध्यापन कार्यनीतींचे प्रकार इत्यादी गोष्टींचा ऊहापोह केलेला आहे. थोडक्यात हे प्रकरण संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे आहे.

प्रकरण-चौथे : संशोधित सामग्रीचे वर्गीकरण व विश्लेषण

या प्रकरणामध्ये शिक्षक प्रश्नावली व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील इतिहास विशेष अध्यापन पध्दतीचे अध्यापन करणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती या साधनांद्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करून त्याचा अन्वयार्थ लावला आहे. अध्ययन व अध्यापन कार्यनीतीबाबत सुचलेले काही विचार मांडले आहेत.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

गोळा केलेल्या सामग्रीच्या लावलेल्या अन्वयार्थाधारे निघणारे निष्कर्ष या प्रकरणामध्ये स्पष्ट केले आहेत व त्यावर आधारित शिफारशी सुचविल्या आहेत. संशोधकाने संशोधन करीत असताना आलेल्या समस्यांवर आधारित पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविलेले आहेत.